अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
शासन निर्णय क्रमांक - टिईएम-२०१२/प्र.क्र. ९८ (भाग -३)/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० जून, २०१२.

संदर्भ : १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्रक्र. F. No. Western/२०१२/१-७१४१६७५७१ dt. १०.०५.२०१२
२) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी ई-मेलद्वारे संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना पाठविलेली यादी.
३) संचालक, तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य , मुंबई यांनी सादर केलेले पत्र क्र. २/एनजीसी/नवीन संस्था/मान्यता/२०१२/७१९ दिनांक २७ जून, २०१२

**शासन निर्णय :** अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या संकेत स्थळावर शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून खालील नमूद केलेल्या संस्थेस नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १ | श्री. सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे सोमेश्वर इंजिनिअरींग कॉलेज, गट नं. ५३, वाघळ वाडी, पोस्ट सोमेश्वर नगर, ता. बारामती, पुणे- ४१२ ३०६ | १) सिव्हील इंजिनिअरींग | ६० |
| | | २) कॉम्प्युटर इजिनिअरींग | ६० |
| | | ३) इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग | ६० |
| | | ४) इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलि कम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० |
| | | ५) मॅकेनिकल इंजिनिअरींग | ६० |

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.
२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक (तंत्रशिक्षण) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.
३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/सलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

सदर संस्था सुरु करण्यासाठी खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्तता करुन माहिती कागदपत्रांच्या प्रतीसहीत या कार्यालयास त्वरीत सादर करावी.

१. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेचे पत्र, शासन मान्यतेचे पत्र, विद्यापीठाचे मान्यता पत्र इत्यादी पत्रांच्या साक्षांकित प्रती.

२. रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर करावे. (सोबत हमीपत्राच्या मसुद्याची प्रत जोडली आहे.)

३. हमीपत्राच्या मसुद्यात दर्शविण्यात आलेल्या विहीत तक्त्यात सदर संस्था सुरु करण्यास अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार नियुक्त केलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांची माहिती समाविष्ट करण्यात यावी.

४. तसेच हमीपत्रात दर्शविण्यात आलेल्या विहित तक्त्यात सदर अभ्यासक्रमासाठी खरेदी करण्यात आलेली पुस्तके, संगणक, यंत्रसामुग्री तसेच फर्निचर बाबतची माहिती सादर करण्यात यावी.

५. संयुक्त खात्यात नियत ठेव ठेवण्यासाठी बँकेचा नमुना स्वाक्षरी फॉर्म संस्थाचालक ह्यांच्या स्वाक्षरी सहीत मा. संचालकांच्या स्वाक्षरी करीता सादर करावा.

सदर संस्थेसाठी पूणे विद्यापीठ, पूणे यांची संलग्नता घेणे आवश्यक आहे. विद्यापीठाची संलग्नता नसल्यास सदर पदवी अभ्यासक्रमाचा केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत समावेश केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी. तसेच वरील बाबींची पूर्तता करुन माहिती कागदपत्रासह सादर केल्यानंतरच अभ्यासक्रम सुरु करण्याची या संचालनालयाची अंतिम परवानगी देण्यात येईल.

(डॉ.चि.म.माहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत.

१. मा. कुलसचिव, पूणे विद्यापीठ, पूणे यांना माहितीसाठी सादर त्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त रक्कम संचालकांच्या संयुक्त खात्यात जमा केल्याची खात्री केल्याशिवाय विद्यार्थ्यांचे एनरॉलमेंट करु नये.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना माहितीसाठी.

C:\Users\desk2\Documents\Shailaja-1\FD letter - new insti 2012-13\New Engg Insti..doc